**नियमित फौजदारी खटला क्रं. १८०/२०१४**
**शासन वि. विठ्ठल**
**नि.क्र. २०.**

**सरकार तर्फे साक्षीदार क्रं. २**

**नांव – अनिकेत अंबादास बिरादार**

**वय – २६ वर्षे, कामधंदा – व्यापार**

**रा. – घोणसी ता. जळकोट**

**साक्षीदार क्र. २ यांच्या शपथेवर सरतपास सरकारतर्फे अधिवक्ता श्री. ए.एस. कदम यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

मला समन्स प्राप्त झाल्याने साक्षीसाठी उपस्थित झालो आहे. दि.१५/०६/२०२४ रोजी सदरची घटना संजीवनी हॉस्पीटल जवळ, स्टँड एस.टी थांब्यापाशी घडली. राहुल अशोक बिरादार, अंबादास नामदेव गणुचे, प्रभाकर धोंडीराम गणुचे, सुर्यकांत बाबाराव मालुसरे, संजीवनी हॉपीस्टल जवळ आम्ही बोलत थांबलो होतो. त्यावेळी दत्तात्रय बाबूराव बिरादार व विठ्ठल परगे यांच्यामध्ये शेतीच्या कारणावरुन वाद लागला होता. विठ्ठल परगे यानी वाद वाढल्यावर शिवागाळ करुन मारहाण केली. तुझ्या आईचा भोसडा, तुझ्या माईला झवतो अशी म्हणून शिवीगाळ केली. त्यानंतर त्याने लाथाबुक्यानी मारहाण केली. त्याने शिवीगाळ करुन पोटात लाथाबुक्या मारल्या व दत्तात्रय बिरादार यांना ढकलून दिले. त्यामुळे उजव्या गुडघ्याला व डाव्या हाताला लागले होते. दत्तात्रय बिरादार आमचा चुलता असल्यामुळे सोडवायला गेलो. त्याने मला शिवीगाळ चालू केली. ते म्हणला की, तुझे हॉटेल फोडतो व माझ्या मुस्काटात मारली. तो म्हणला दत्तात्रय बिरादार सोबत शेतात आला तर तुझे पाय तोडतो. त्यावेळी आमच्याशी

बोलणा–यानी आमची भांडणे सोडवली. आरोपीला पाहिले तर मी ओळखू शकतो.

**साक्षीदार क्र. २ चा उलटतपास आरोपी तर्फे श्री. व्ही.एन. केंद्रे यांचेद्वारे शपथेवर सुरुः–**

बसस्टॅड पासून माझे घर ४०० मीटर च्या अंतरावर आहे. त्या ठिकाणी बस स्टॅड असल्यामुळे वरदळ खुप असते. त्या ठिकाणी इतर गावातील प्रवासी पण असतात. भांडणाचा एखादा प्रकार घडला तर तेथील सर्व लोक जमतात. पोलिसानी माझा जबाब नोंदविला होता. विठ्ठल परगे यांनी पोटात लाथाबुक्या मारल्याचे पोलिसाना सांगितले होते. प्रभाकर गणुचे तिथे हजर असल्याचे सांगितले होते. मी उजव्या गुडघ्याला व डाव्या हाताला लागल्याचे पोलिसाना सांगितले होते. माझ्या मुस्काटात मारल्याचे मी पोलिसांना सांगितले का माहित नाही. वरील सर्व गोष्टी पोलिसाच्या जबाबात नमुद नाही यांचे कारण मी सांगू शकत नाही. हे म्हणणे खरे नाही की, दि.१५/०६/२०२४ ला घटना घडली हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, राहुल अशोक बिरादार, अंबादास नामदेव गणुचे, सुर्यकांत बाबाराव मालुसरे हे आम्ही बस स्टँडवर गप्पा मारत बसलो होतो हे खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, माझ्या समोर तुझ्या आईचा भोसडा, तुझ्या माईला झवतो शिव्या दिल्या हे मी खोटे सांगत आहे. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने हॉटेल फोडण्याची धमकी दिली हे मी खोटे सांगत आहे. माझे चुलते व विठ्ठल परगे यांच्यामध्ये शेती वादावरुन भांडणे

चालू आहेत. हे म्हणणे खरे नाही की, चुलत्याला मदत करण्यासाठी खोटी साक्ष देत आहे.

उलटतपास संपला.

पुनःतपास नाही.

**श्रवणोत्तर स्वीकृत,**

Digitally signed by VIJAY RAMCHANDRA GHARAL
Date: 2025.07.25 17:42:22 +0530

**दिनांक – २५/०७/२०२५** **न्यायदंडाधिकारी प्र.व.**
**(न्यायालय क्रं. १), उदगीर.**